MHKO110005862022

**नियमित दिवाणी दावा क्र. ६८ / २०२२.**
(CNR No.**MHKO110005862022**)

## निशाणी क्र. ३१ खालील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथन की, प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.१० हिचे नांव अक्काताई बाळासो शेवडे असे नमूद करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.१० हिला व तिच्या पतीला घरातील सदस्य वेगवेगळ्या नावाने बोलावतात, त्याप्रमाणे तिचे नांव दाव्यात दाखल केले होते. मात्र प्रतिवादी हिचे मुळ नांव सुशिला मनोहर शेवडे असे आहे. त्यामुळे दाव्यामध्ये कोणतीही तांत्रिक अडचण राहू नये यासाठी प्रतिवादी क्र.१० हिच्या नावामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक असल्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करून तशी दुरूस्ती करण्यासाठी त्यांना परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

०३. वादींचे पुढील कथन की, वादी सुचवत असलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरूपाची आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु याउलट वादींचे अपरिमित व कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. वादींनी मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असलेने सदरची दुरुस्ती मंजूर होणे अत्यंत निकडीचे आहे. तसेच, दावा दुरुस्ती नंतर दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करून वादी यांनी सदरची चूक जाणून बुजून केली असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०६. पुढील विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे

कलम ६ नियम १७ मधील खाली नमूद कायदेशीर तरतूद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा** -

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

परंतु न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुद्धा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा गुणदोषांवर निकाली करण्यासाठी दाव्याबाबतची सर्व परिस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज मंजूर करून वादींना त्यांच्या वादकथनांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देणे न्यायोचित होईल. तसेच प्रस्तावित सुधारणा करण्यात आल्यास दाव्याचे मूळ स्वरुपात कोणताही फेरबदल होणार नाही. उलटपक्षी दाव्याचा गुणदोषांवर अंतिम न्यायनिवाडा करण्याकरता प्रस्तावित सुधारणा ही क्रमप्राप्त आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादी यांचा **निशाणी क्र.३१** वरील अर्ज, रक्कम रू. १५०/- इतक्या दंड रक्कमेवर मंजूर करण्यात येत आहे. सदर दंडाची रक्कम प्रतिवादी यांना अदा करण्यात यावी.

२. वादींनी प्रस्तुत आदेशाचे तारखेपासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्यानुसार दावा दुरुस्ती करून, दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by LYAKATALI MUBARAK PATHAN
Date: 2024.04.16 17:27:35 +0530

**(एल. एम. पठाण)**

दिनांक. १६/०४/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव